जें खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो |
भूतां परस्परे पडो |

# मैत्र

जीवाचें ||



बाल्टिमोर मराठी मंडळ

२०२३ अंक १

**मैत्र संपादक मंडळ २०२३**

**वरदा वैद्य**
**विदुला कोल्हटकर**
**रोहित कोल्हटकर**
**मधुर पुरोहित**
**कपिल धाकड**

**बाममं कार्यकारिणी २०२३**

अध्यक्ष – **अनीश पाटील**
उपाध्यक्ष – **वृंदा जोशी**
उपाध्यक्ष (विपणन) – **पंकज शिवपुजे**
चिटणीस – **केतन शहापुरे**
खजिनदार – **योगेश खैरनार**
सह-खजिनदार – **स्मितेश लोकरे**
मुलांच्या कार्यक्रमांचे आयोजन– **वैशाली खैरनार**
ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यक्रमांचे आयोजन– **सुषमा भोसले**
बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधी – **राजेंद्र मोडक**

# संपादकीय

सर्वप्रथम तुम्हा सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! म्हणता म्हणता २०२२ साल सरले आणि हा अंक तुम्ही वाचायला घ्याल तेव्हा २०२३ चा एक महिनासुद्धा संपला असेल. काळ हा सतत गतिमान असतो हे ह्या अंकातल्या एका लेखात तुम्ही वाचालच, त्याचा प्रत्यय आम्हाला ह्या अंकावर काम करत असताना आला. मैत्रच्या ह्या वर्षीच्या पहिल्या अंकातून तुमच्यासमोर वेगवेगळ्या विषयांवरील लेखन सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. बृहन्बाल्टिमोर परिसरातील मराठी मंडळींनी नवीन वर्षांची सुरुवात अंकाला उत्स्फूर्तपणे भरभरून प्रतिसाद देत केल्यामुळेच हे शक्य झाले आहे.

मागचे वर्ष चालू झाले ते ओमिक्रोन ह्या नवीन प्रकारच्या कोविड विषाणूंच्या आगमनामुळे. मात्र हळूहळू त्याचा प्रभाव कमी झाला असे म्हणा किंवा वाढत्या लसीकरणांमुळे हळूहळू दैनंदिन जीवन परत एकदा पूर्वपदावर यायला लागले. कतारमध्ये झालेला फुटबॉलच्या विश्वकरंडकासाठीचा सामना तुम्ही बघितलात का? अर्जेंटिनाने तब्बल ३६ वर्षांनंतर विश्वकरंडक जिंकला. १९८६मध्ये अर्जेंटिनाचा कप्तान दिएगो मॅराडोना ह्याचा खेळ भारतात रात्री उशिरा जागून बघितलेला तुमच्यातल्या काहींना आठवत असेल. तुमच्या आवडता खेळ बघतानाच्या काही आठवणी असतील तर त्याबद्दल आम्हाला जरूर कळवा. महिन्याभरापूर्वी संपलेल्या हिवाळी सुट्टीत तुम्ही प्रवास केलात का? भारतात गेलात की इतर देशांत की इथेच आसपास? तुम्ही हिवाळी सुट्टी कशी घालवलीत ते आम्हाला तुमच्या प्रवासवर्णनांतून लिहून कळवा.

ह्या वर्षांची सुरुवात धमाकेदार अंकाने करत आहोत. ह्या अंकासाठी लेखन पाठवणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. ह्या मंडळींनी वेगवेगळे साहित्यप्रकार हाताळले आहेत. 'जंगल सफारीच्या वाटेवर' भेटलेल्या वाघाबद्दल ह्या अंकात वाचता येईल. छायाचित्रणाचा छंद जोपासणाऱ्या दोघींकडून आलेल्या वेगवेगळ्या पक्ष्यांच्या छायाचित्रांसोबत ह्या अंकात 'कलाकार ओळख' सदरामध्ये अनिरुद्ध गंधेच्या 'लाकूडकामा'च्या छंदाबद्दल वाचतानाच त्याने केलेल्या विविध लाकडी कलाकृतींची छायाचित्रेही पाहता येतील. एका कविता आणि एका विडंबनासोबतच बा.सी. मर्ढेकरांच्या सुप्रसिद्ध 'शिशिरागम' ह्या कवितेचे रसग्रहणही ह्या अंकात वाचता येईल. जागतिक संगीताचा आस्वाद घेताघेता स्वतःच्या संगीत प्रेमाचा धांडोळा 'संगीत आणि बरंच काही' ह्या लेखामध्ये वाचा. अष्टवसूंच्या पौराणिक कथेसोबतच मार्जारमालक जोडप्याची आधुनिक कथाही ह्या अंकात आहे. ह्याशिवाय, भाषाविचार सदरांतर्गत आपल्या भाषेतल्या काही क्रियापदांचा 'धावता' आढावा घेऊ या.

चित्रसाहित्य सदरामध्ये 'प्रतिबिंब' हे सूत्र असलेली चार चित्रे गेल्या अंकामध्ये दिली होती. त्यावरची दोन लिखाणे ह्या अंकात आहेत. ह्या अंकामध्येही 'चंद्र' हे सूत्र असलेली चार चित्रे दिली आहेत. चित्रे पाहून तुम्हाला सुचलेले विचार तुम्ही आम्हाला लिहून कळवायचे आहेत, जे आम्ही पुढच्या अंकात प्रकाशित करू.

मैत्रचा पुढचा अंक एप्रिल महिन्याअखेरीस प्रकाशित होईल. त्या अंकासाठी तुम्ही भरभरून साहित्य पाठवाल अशी आशा करतो. अंकासाठीचे साहित्य १५ एप्रिलपर्यंत editor@baltimoremarathimandal.org ह्या पत्त्यावर पाठवायचे आहे. नेहमीप्रमाणे कथा, कविता, लेख, अनुभव, पाककृती, कला/छायाचित्रे, छंद, प्रवासवर्णन, मुलाखत, वगैरे सर्व साहित्यप्रकारांचे स्वागतच आहे. तसेच, मैत्र संपादक मंडळामध्ये सहभागी होण्याची तुमची इच्छा असल्यास आम्हाला नक्की कळवा.

ह्या नवीन वर्षात तुमच्या हातून सातत्याने सकस लेखन घडो, ही सदिच्छा!

कळावे,
संपादक मंडळ

## ह्या अंकात –


**चित्रसाहित्य**
- प्रतिबिंब – शारदा सबनीस
- प्रतिभास – विदुला कोल्हटकर

**कलाकार ओळख**
- माझा छंद – अनिरुद्ध गंधे

**भाषाविचार**
- पळा पळा, कोण पुढे पळे तो – वरदा वैद्य

**कविता**
- माझा विठ्ठल – मैत्रेयी कुलकर्णी
- धुक्यातले पैसे (विडंबन) – रोहित कोल्हटकर

**लेख/अनुभव**
- जंगल सफारीच्या वाटेवर – शुभदा जोशी-पारखी
- संगीत आणि बरंच काही – मैत्रेयी कुलकर्णी
- कवितेचं पान (शिशिरागम) – अनिल मायभाटे
- जीवनशैली – बाळकृष्ण पाडळकर

**कथा**
- अष्टवसूंची कथा– अवंती करंदीकर
- जादू आणि भुत्या यांची गोष्ट – मिलिंद पदकी

**प्रकाशचित्रे**
- परसातले पक्षी– सपना औटे
- लेन्सच्या मागे – प्रिया जोशी




**मुखपृष्ठ** – सुतार
छायाचित्रकार – सपना औटे



शुभदा जोशी–पारखी

माझा जन्म आणि शिक्षण सांगलीचे. व्यवसायाने आर्किटेक्ट असून सांगलीला प्रॅक्टिस करत होते. नऊ महिन्यांपूर्वी अमेरिकेत आले असून कोलंबिया, मेरीलँडमध्ये वास्तव्य. गायनाची आवड आहे. सांगलीत असताना शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले आहे.

# जंगल सफारीच्या वाटेवर

सहल हा सगळ्यांच्याच आवडीचा विषय. सुट्टीमधे कुठे फिरायला जायचं, यासाठी अनेक घरात प्रवासाच्या बरेच दिवस आधीपासून बेत आखले जातात.  काही नवीन अनुभव निसर्गाच्या कुशीत शिरून घेता यावा यासाठी प्रत्येकजणच इच्छुक असतो. तसाच एक बेत मागील सुट्टीमधे आम्हीदेखील आखला होता, तो म्हणजे जंगल सफारीचा. त्यासाठी ठिकाण निश्चित केलं, महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र प्रकल्प. माझा जंगल सफारीचा हा पहिलाच अनुभव असणार होता, त्यामुळे त्याबाबत खूप उत्सुकता आणि उत्कंठा होती. सुट्टीमध्ये तिथे असणाऱ्या गर्दीमुळे गैरसोय होऊ नये म्हणून हॉटेलबरोबरच सफारीचं बुकिंगही आधीच करून आम्ही प्रवासाला निघालो.

वर्धा रेल्वेस्थानकावर उतरून मग ताडोबा पर्यंतच्या पुढील प्रवासासाठी खाजगी कार भाडेतत्त्वावर घेऊन आम्ही मार्गस्थ झालो. ताडोबाला पोहोचेपर्यंत निसर्गाने काळोखाची चादर पांघरून घेतली होती. त्या काळोखात ताडोबातील हॉटेलच्या दिशेने जाणारा तो रस्ता जास्तच सुनसान भासत होता. ताडोबातील MTDC हॉटेलमध्ये दोन रात्री मुक्काम निश्चित केला होता. हॉटेलमध्ये पोहोचेपर्यंत रात्रीचे जवळपास नऊ वाजत आले होते. दिवसभराच्या प्रवासानंतर रात्रीचे जेवण करून आम्ही झोपेला आपलसं केलं. दुसऱ्या दिवशी पहाटेच्याच सफारीचं बुकिंग असल्यामुळे, भल्या पहाटे उठून आणि सफारीसाठीची तयारी करून आम्ही निघालो. ताडोबातील सफारीसाठी काही प्रवेशद्वारं आहेत, त्यातील एका प्रवेशद्वारापाशी आम्ही आलो. तिथेच जंगलात सफारीसाठी घेऊन जाणाऱ्या वाहनांची रांग उभी होती. बुकिंगप्रमाणे त्यातील एका जिप्सी कारमध्ये आम्हाला बसण्यास सांगितलं गेलं; आणि तशा काही कार प्रवासी लोकांनी भरल्यानंतर, एकामागोमाग एक अशी त्या वाहनांची सफारीसाठी जंगलाच्या दिशेने रवानगी करण्यात आली.

पहाटे ६ च्या सुमाराची वेळ असल्यामुळे हवेतील गारवा, जंगलातील दाट झाडीच्या सान्निध्यात जास्तच जाणवत होता. त्याच दाट झाडीतून वाहनांसाठी तयार करण्यात आलेली वाट वळणं घेत होती. रोजच्या शहरी जीवनातील गडबडगोंधळ आणि प्रदूषणापासून दूर, त्या पहाटेच्या वेळेस जंगलातील स्वच्छ हवा आणि शांतता आपसूकच मनाला भुरळ घालत होती. वाहनातून जंगलातील वाटेवरून जाताना सोबत असणारा गाईड आम्हाला वन्यजीवनातील महत्त्वाचे घटक असणाऱ्या प्राणी आणि पक्ष्यांची ओळख करून देत होता. विविध जातीचे पक्षी आणि काही वन्य प्राणी जसे की हरीण, सांबर, हत्ती, गवा, अस्वल, रानकोंबडा, कोल्हा, यांना जंगलातून मुक्तपणे संचार करताना बघून, प्राणीसंग्रहालयातील पिंजऱ्यात वावरताना त्यांची होणारी घुसमट, स्वातंत्र्यप्रिय म्हणून ओळख निर्माण केलेल्या मनुष्यप्राण्याला नक्कीच जाणवू शकते. हा सगळा अनुभव सफारीतील प्रत्येकजण कॅमेऱ्यात टिपत होता. त्या शांततेत कॅमेऱ्याच्या क्लिक्समुळे होणारा भंग देखील लक्षात येण्याजोगा होता. हे सगळे घडत असताना मुख्य प्रतीक्षा होती ती म्हणजे, आपल्या देशाचा राष्ट्रीय प्राणी म्हणून ओळख असणाऱ्या रॉयल  बंगाल टायगर अर्थात वाघाची. जंगल सफारीसाठी आलेल्या प्रत्येकाला, वाघाला मुक्तपणे संचार करताना पाहण्याची इच्छा असते; आणि ताडोबा तर व्याघ्र प्रकल्पच आहे. त्यामुळे आम्हीदेखील त्या क्षणाचीच वाट पाहात होतो.

सफारीचा वेळ जवळपास अर्धा निघून गेल्यावर, जंगलातील एका वाटेवर अचानक एकानंतर एक वाहने थांबण्यास सुरुवात झाली आणि बघतो तर काय, त्याच वाटेवर मध्यभागी बहुप्रतीक्षित रॉयल बंगाल टायगर ऐटीत बसलेला दिसला. तो क्षण कॅमेऱ्यात टिपण्यासाठी सफारीतील प्रत्येकजण उतावळा झाला होता. कॅमेऱ्याचे क्लिक्स थांबण्यास तयारच नव्हते. वाघाचे दर्शन झाल्याचा आनंद सगळ्यांच्याच चेहऱ्यावर जाणवत होता. सोबत असणाऱ्या गाईडने देखील त्या वाघासंदर्भात आणि व्याघ्र प्रकल्पाची आणखी काही माहीती आम्हाला दिली. अशा वातावरणात ५ ते १० मिनिटे गेल्यावर वाघ आजूबाजूच्या झाडीत दिसेनासा झाला. माझ्या पहिल्याच जंगल सफारीत मला वाघाचे दर्शन झाल्यामुळे मी खूपच खुशीत होते. त्या आनंदात सफारीचा ४ तासांचा वेळ कधी संपला ते कळलंच नाही.

त्याचदिवशी दुपारी ४च्या सुमारास आणखी एका सफारीचं, ताडोबातील दुसऱ्या प्रवेशद्वारापासून आणि वेगळ्या झोनमध्ये बुकिंग केलं होतं. ती सफारीदेखील खूपच छान झाली. संध्याकाळी ७च्या सुमारास ती सफारी संपल्यानंतर, रात्रीचे जेवण करून आम्ही हॉटेलमध्ये परतलो. दिवसभरात झालेल्या दोन्ही सफारीतील, कॅमेऱ्यात टिपलेले क्षण पुन्हा पुन्हा पाहाताना आणि त्या अनुभवाविषयी गप्पा मारताना, मध्यरात्र उलटून गेल्याचंदेखील भान राहिलं नाही. दुसऱ्या दिवशी परतीच्या प्रवासाला निघायचं होतं.

निसर्गाच्या सान्निध्यात घेतलेला हा सफारीचा अनुभव खरंच खूप अनोखा होता. तिथून निघायची इच्छाच होत नव्हती, पण घरदेखील वाट पाहात होतं. जंगल सफारीचा हा अनुभव कॅमेऱ्यात पण त्याहीपेक्षा जास्त मनात साठवून आम्ही परतीची वाट धरली, ती भविष्यात पुन्हा एकदा अशा आणखी एखाद्या अविस्मरणीय अनुभवासाठी परत येण्याची खूणगाठ मनाशी बांधूनच!

कलाकार ओळख

# माझा छंद



अनिरुद्ध गंधे

"तुझे काय छंद आहेत?" लहान असताना हा प्रश्न हमखास विचारला जायचा. मग चित्रकला, वाचन, गायन इत्यादी छंद उत्तरादाखल सांगितले जायचे. हळू हळू जसा मोठा झालो तसे एक एक छंद कमी झाले. नंतर नंतर तर तो प्रश्न सुद्धा बंद झाला. छंदाचा वेळ अभ्यासाकरता आणि नंतर ऑफिसच्या भरमसाट कामाकरता वापरला जाऊ लागला. मुलं झाल्यावर तर त्यांच्या आवडीनिवडी आणि त्यांचे छंद महत्त्वाचे ठरू लागले. अशी बरीच वर्षं छंदाविना काढली, पण गेल्या २–३ वर्षात मला नवा छंद जडला आहे – वुड वर्किंगचा– म्हणजेच लाकूडकामाचा. ह्या माझ्या  छंदाची गोष्ट मी तुम्हाला ह्या लेखात सांगणार आहे.

२०१८मध्ये नवीन घर घेतल्यावर एक गोष्ट लक्षात आली की प्रत्येक बारीकसारीक कामाकरता हॅण्डीमॅन बोलावणे परवडणार नाही. मग घरातली छोटी मोठी दुरुस्तीची कामं करायला लागलो. स्वयंपाकघरातला नळ बदलणे, खोलीतील दिवे काढून पंखा बसवणे, कपाटांमध्ये नवे कप्पे करणे इत्यादी इत्यादी. माझ्या सासऱ्यांनासुद्धा अशी छोटी–मोठी कामं स्वतः करण्याची आवड आहे. मग ते अमेरिकेत आल्यावर त्यांनी मला स्वयंपाकघरामध्ये फ्लोटिंग फ्लोअर्स, आणि तळघरात सीलिंग टाईल्स लावायला मदत केली. हे सगळं चालू असतांना ऑफिसमधल्या सहकाऱ्यांशी बोलताना असं जाणवलं की अशी घरातली किरकोळ दुरुस्तीची कामं स्वतः करणं हे त्यांच्याकरता नेहमीचं आहे आणि प्रत्येकजण काही ना काही छंद जोपासतो. पण माझ्याकडे एकही छंद नाही.



आणि मग महामारी (Pandemic) सुरु झाली. सगळी उद्यानं बंद झाली. आता मुलं काय करणार? मग त्यांच्याकरता झोपाळा (swing set) बनवला. जी थोडी हत्यारं घेऊन ठेवली होती त्यांचा उपयोग झाला. गराजमध्ये सामान ठेवायला मांडण्या नव्हत्या, मग त्या तयार केल्या.

आणखी पुढे जाण्यापूर्वी दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगतो. पहिली, माझ्या सगळ्या प्रकल्पांमध्ये माझ्या सौचा सिंहाचा, नव्हे सिंहिणीचा वाटा आहे. अगदी होम डीपोमधून प्लायवूड बोर्ड्स गाडीच्या टपावर लादून आणण्यापासून डिझाईनमध्ये सुधारणा सुचवण्यापर्यंत तिचा सहभाग असतो. दुसरी, ह्या संपूर्ण प्रवासात यूट्यूब माझा गुरु आहे. हत्यारं कशी वापरायची ते कपाटं कशी बनवायची, ह्याचे अगदी तपशीलवार व्हिडीओ उपलब्ध असतात. अगदी तसंच्या तसं बनवलं नाही तरी अंदाज येतो की कसं बनवायचं आहे ते.

यूट्यूब वापरण्याचा आणखी एक फायदा म्हणजे ते मला नाजूक लाकूडकामांचे व्हिडीओ सुचवू लागले. मग मी स्क्रोल करवत आणली आणि त्याचे व्हिडीओ बघून नावाच्या पाट्या बनवल्या आणि तशाच आणखी काही नाजूक गोष्टी –  बाल्टिमोर रेव्हन्सचं चिन्ह (लोगो), न्यू इंग्लंड पेट्रियट्सचं चिन्ह –  बनवल्या. एक गोष्ट मात्र खरी आहे आणि ती म्हणजे यूट्यूबवर लोकं जितक्या सहजतेने एखादी गोष्ट दाखवतात त्यापेक्षा त्याच्या अनेकपटीने ती गोष्ट अवघड असते. पण आपल्याकडे जिद्द असेल तर पहिल्या, दुसऱ्या नाहीतर तिसऱ्या प्रयत्नाला यश नक्की येतं.










गेले काही दिवस मला 'वुड बर्निंग'चे व्हिडीओ सुचवले जात होते. त्यासाठीचं सामान आणून त्याचे १–२ प्रकल्प केले. त्याला 'लेझर बर्निंग'ची सर किंवा सफाई येणार नाही, पण करताना खूप मजा येते. आणखी एक गोष्ट म्हणजे प्रत्येक प्रकल्पात प्रत्यक्ष कामासाठीचा वेळ कमी आणि तयारीमध्येच जास्त वेळ जातो, आणि हे नाजूक लाकूडकामाला जास्त लागू होतं. माझ्या बऱ्याच प्रकल्पांमध्ये मी कॉम्प्युटर फोटोशॉपवर जास्त वेळ घालवतो.
माझे बरेचसे प्रकल्प मी भेटवस्तू म्हणून बनवतो आणि मी त्यांना एकमेवाद्वितीय आणि व्यक्तिगत (personal) बनवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतो. त्यामुळे तशी प्रेरणा मिळाल्याशिवाय ते घडत नाहीत.

बरेच महिने मी 'रेझिन आर्ट'चे व्हिडीओ बघतोय, पण अजून प्रकल्पाचं धाडस होतं नाहीये. बघू .



**मैत्रेयी कुलकर्णी**

मी साधारण वर्षभरापूर्वी (डिसेंबर २०२१) अमेरिकेत आले. सध्या मी व माझा नवरा एलिकॉट सिटीत राहतो. मी पूर्णवेळ आयटीवाली आहे आणि तेवढीच पूर्णवेळ मी वाचन, कधीकधी चुकतमाकत लिखाण आणि एकूणच दुनियाभरातल्या मला भन्नाट वाटणाऱ्या गोष्टींत रमते. मी बरीच वर्षं पुण्याची, पण खरं सांगायचं तर शेवगाव, जिल्हा अहमदनगरची.

# माझा विठ्ठल

माझा विठ्ठल मलाच शोधायचा असतो..
मी धुंडाळत असते अंतरात्मा वगैरे,
आणि तो माळ्यावरून खाली माझी मजा बघत असतो!

तो विठ्ठल सगळ्या जांभळ्या सावळ्याचा साक्षीदार,
तो विठ्ठल त्या प्रत्येक निर्गुणाचा आकार,
अथांग भावनेच्या पसाऱ्याचा अगदी आतला एक पापुद्रा...
माझ्याच हाताने मीच कोरलेला तो नाचरा मोर असतो,

दिंडी जाते दारावरून अन् त्यात हुडकत रहाते मी तुला,
ग्यानबा तुकारामाच्या गजरात फक्त डोलारा हिंदकळत जातो,
उरते जेव्हा एकटी तेव्हा नजर कोपऱ्यातल्या विटेवर पडते,
तू नसतोस तिथे, खालच्या वाळूनेही तळ हलवलेला असतो,

मी धुंडाळत रहाते बाहेरच्या जगात वगैरे,
आणि तू माळ्यावरून खाली माझी मजा बघत असतो!
हा माळा तरी कसा रे, अगदी अडगळीची जागा,
मनाच्याही वरचा मजला आणि अनेक अस्तरी, भुयारी त्या वाटा,

मशाल सख्या हिमतीची घेऊन एका हाती,
हळुवार कराव्या लागतात बाजूला अनेक जाळ्या,
शेकडो खणलेले खड्डे आणि वरवर बुजवलेल्या कहाण्या,

माझंच भुंडं शेत अन् माझीच रंगीबेरंगी माती,
तुला शोधण्याचा ध्यास पण खरी शोधयात्रा माझीच,

त्या माळ्यावर मला सापडते राही माझ्यातली अन् सत्यभामा,
अश्या अनेक मी आणि त्यांत लपलेला अंश तुझा,
माझ्या मनातल्या तुझ्या प्रतिमेचं तू फक्त प्रतिबिंब,
शोधलं माळ्यावर तेव्हा ढवळलं गेलं फक्त ते अंतरंग,

माहित असतं तुला की हे असंच होणार,
चंद्रभागेच्या वाळवंटात पोहोचेपर्यंत सगळं मोकळं होऊन जाणार,
मला हे कळायला तुझा आधार नको असतो,
हे ही माहित असतं तुला! म्हणून तू मलाच शोधायला पाठवतोस,

वारी माझी विठ्ठला, तेव्हाच पुरी होते,
भूवैकुंठी यायच्या आधीच शोधाची जाणीव स्वतःत विरघळून जाते..



अवंती करंदीकर

# पौराणिक कथा – भाग २ – अष्टवसूंची कथा

मैत्रच्या जानेवारी २०२१ च्या अंकामध्ये आपण "पौराणिक कथा भाग १ – पुराणांची माहिती" ह्या लेखामध्ये पुराणे म्हणजे काय हे जाणून घेतले. त्याच सत्रातील दुसरा भाग प्रकाशित करत आहे. ह्या भागापासून पुराणातील गमतीदार, रोचक आणि जादुई कथांची सुरुवात आहे. ह्या भागामध्ये अष्टवसूंची कथा वर्णन केली आहे.

आता वसू कोण होते हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. काही संदर्भांमध्ये वसू सर्व तत्वांचे (जसे जल, वायू, पृथ्वी) प्रतिक आहेत तर काही संदर्भांमध्ये त्यांना आठ दिशांचे प्रतिबिंब व रक्षक संबोधले आहे. काही संदर्भांमध्ये दक्षाची मुलगी वसू आणि धर्म ह्यांची मुले अष्टवसू तर काही संदर्भांमध्ये वसू ही आदिती व कश्यपाची मुले असा उल्लेख आढळतो. वसूंच्या नावांमध्येही तफावत आढळते. महाभारतातील आदिपर्वानुसार वसूंची नावे धर, ध्रुव, सोम, आहास, अनिल, अनल, प्रत्युष आणि प्रभास अशी आहेत. विष्णूपुराणानुसार वसूंची नावे आप, ध्रुव, सोम, धर्म, अनिल, अनल, प्रत्युष आणि प्रभास तर भागवतपुराणानुसार द्रोण, प्राण, ध्रुव, अर्क, अग्नी, दोष, वसू आणि विभासु अशी आहेत. आपण ह्या कथेपुरती विष्णूपुराणामधील नावे ग्राह्य धरणार आहोत.

अष्टवसू इंद्राच्या दरबारात कार्यरत होते. एकदा इंद्रसभेमध्ये वसिष्ठ ऋषींचा आश्रम हा दुसरा स्वर्गच आहे अशी ऋषी, मुनी आणि देवदेवतांची चर्चा चालू असते. ते ऐकून सर्व वसूंना त्यांचा आश्रम बघायची इच्छा होते. म्हणून वसुंमधील ज्येष्ठ प्रभास, वसिष्ठ ऋषींकडे त्यांचा आश्रम बघायची इच्छा व्यक्त करतो. हर्षित होऊन वसिष्ठ त्यांच्या आश्रमाचे दार वसूंसाठी सदैव खुले राहील आणि ते कधीही आश्रमाला भेट देऊ शकतात असे जणू वचनच त्यांना देऊन आपल्या आश्रमी प्रस्थान करतात.

मध्ये बराच काळ लोटतो. एकदा सर्व वसू आपल्या पत्नींसह स्वर्गातून पृथ्वीविहारासाठी येतात. अनेक सुंदर देश, नद्या, तळी, वनराई आणि अनेक वैविध्याने नटलेली पृथ्वी त्यांना मोहित करते. असेच एका सुंदर तळ्यापाशी जलक्रीडेचा आनंद घेत असताना प्रत्युष आणि प्रभास इतर वसुंशी आपण आता पृथ्वीवर आलोच आहोत तर वसिष्ठ ऋषींच्या आश्रमाला भेट देण्याची इच्छा प्रकट करतात. त्यावर सगळ्यांचे एकमत होते व जलक्रीडा संपवून सगळेजण ऋषींच्या आश्रमाकडे प्रयाण करतात. सर्व वसूंना बघून वसिष्ठ ऋषी त्यांचे आनंदाने व प्रेमाने स्वागत करतात. सर्वजण जलप्राशन, फलाहार व आदरातिथ्य आटोपून आश्रमविहारासाठी बाहेर पडतात. आश्रमातील स्वच्छता, अनेक छोटे मोठे प्राणी, निरनिराळी फुले, लता, वेली आणि फळझाडांनी संपन्न आश्रम बघून तिकडे राहावेसे वाटले नाही तरच नवल. आश्रमविहार संपवून सर्व जण परत येतात. तेवढ्यात सर्वांना भोजनाचे आमंत्रण येते. थोड्या वेळातच विविध पक्वान्नांची ताटे समोर येतात. ते बघून सर्वजण एकदम अचंबित होतात व त्यांना प्रश्न पडतो की एवढ्या थोड्या अवधीत इतक्या लोकांसाठी भोजन कसे काय तयार झाले? ह्या विचारातच सर्व मंडळी त्या मिष्टान्नांचा यथेच्छ आस्वाद घेतात. मुख आणि हस्तप्रक्षालन झाल्यावर मंडळींची वसिष्ठ ऋषींशी विविध विषयावर चर्चा चालू असते. प्रभास प्रांजळपणे वसिष्ठ मुनींना एवढे सुग्रास जेवण इतक्या थोड्या अवधीत कसे आणि कुणी तयार केले असे विचारतो. त्यावर वसिष्ठ ऋषी आपल्याकडे कामधेनू गाय आहे आणि तिच्यामुळे आश्रम कसा समृद्ध झाला आहे, ती कितीही लोकांना मिष्टान्न कसे पुरवू शकते ह्याची माहिती सांगतात. ती सुंदर कामधेनू पाहाताच वसूंच्या आश्चर्याला पारावार उरत नाही. प्रभासच्या पत्नीला मात्र त्या कामधेनूचा लोभ होतो. ती प्रभासकडे आपल्याकडे ही कामधेनू असेल तर आपल्याला कशाचीच उणीव भासणार नाही, तेव्हा काहीही करून तुम्ही ती कामधेनू मिळवाच, असा तगादा लावते. हे ऐकून प्रभास चकित होतो आणि आपली पत्नी आपल्याकडे सर्व काही असताना अशी काय वेडगळ मागणी करीत आहे म्हणून वारंवार तिला समजावून सांगतो, पण ती काही केल्या आपला हट्ट सोडत नाही.

शेवटी प्रभास आणि त्याच्या पत्नीमधला संवाद इतर वसूंपर्यंत पोहोचतो. न राहवून प्रभास आपल्या पत्नीच्या हट्टापायी सर्व वसूंकडे मदतीची याचना करतो. त्यांच्यातल्या थोड्या विवादानंतर न राहवून सर्व वसू प्रभासच्या साहाय्याने ती कामधेनू चोरून पळून जातात.

थोड्याच वेळात आश्रमातील लोक वसिष्ठ ऋषींना कामधेनू नाहीशी झाल्याचे सांगतात. तेंव्हा ते आपल्या योगसामर्थ्याने कामधेनू वसूंनी पळवली आहे हे ओळखतात. त्यांचा राग अनावर होतो व ते चिडून सर्व वसूंना पृथ्वीवर मानव जन्म मिळेल असा शाप देतात. त्याबरोबर सर्व वसू वसिष्ठ ऋषींची क्षमायाचना करतात. क्षमायाचनांनी वसिष्ठ ऋषींना त्यांची दया येते व ते म्हणतात," मी माझा शाप मागे घेऊ शकत नाही पण उ:शाप देऊन त्याची मर्यादा कमी करू शकतो, म्हणून तुम्ही मानवजन्म घेतल्याबरोबरच तुमचा मृत्यू होईल." प्रभासला मात्र उ:शाप देण्याचे ते नाकारतात. तेव्हा अस्वस्थ आणि खजील झालेला प्रभास वसिष्ठ ऋषींची आळवणी करतो. तेव्हा त्यांना त्याची दया येते व ते त्याला उ:शाप देतात. "तुला पृथ्वीवर मानवजन्म घ्यावाच लागेल, परंतु अतिशय प्रसिद्ध योद्धा म्हणून तुझी कीर्ती पसरेल, तुला इच्छामरणाचे वरदान प्राप्त होईल आणि पृथ्वीवरील सर्व उत्तमोत्तम भोग भोगून तुला अंती स्वर्गप्राप्ती होईल. पण तू आपल्या पत्नीचे ऐकून सारासार विचार न करता माझी कामधेनू चोरलीस म्हणून मानव जन्मात तुला विवाहसौख्य मात्र लाभणार नाही, तथास्तु!" असे म्हणून वसिष्ठ ऋषी अंतर्धान पावतात.

झालेल्या प्रकाराने सर्व वसू खिन्न होऊन स्वर्गाकडे प्रयाण करत असताना वाटेत त्यांची भेट गंगेशी (म्हणजे गंगा नदीशी) होते. त्या सगळ्यांना खिन्न बघून गंगा त्यांची विचारपूस करते. झालेला प्रकार समजल्यावर तिला त्या सगळ्यांची खूप दया येते आणि ती त्यांना वचन देते की ती त्यांना मानव जन्मातून मुक्ती मिळवण्यासाठी मदत करेल.

पुढे द्वापारयुगामध्ये कुरुवंशीय राजा शंतनू गंगेच्या प्रेमात पडून तिला लग्नाची मागणी घालतो. पण गंगा त्याला एक अट घालते ती अशी – की त्यांना लग्नानंतर मुले झाली की गंगा त्यांना लगेच पाण्यात सोडून देईल आणि शंतनूने तिला तसे करण्याबद्दल एकही प्रश्न विचारू नये अथवा विरोधही करू नये. जर का त्याने तसे केले तर गंगा त्याला तत्काळ सोडून जाईल. अशा विचित्र मागणीने शंतनू सैरभर झाला नाही तरच नवल. त्याला काय करावे ते कळत नाही. पण शेवटी म्हणतात ना 'कामातुराणां न भयं न लज्जा' – म्हणजेच 'कामातुर झालेल्या आणि प्रेमात पडलेल्या व्यक्तीला ना कशाची भीती वाटते ना त्यांना आपल्या आचरणांची लाज वाटते', तेच शंतनूचे होते आणि अखेर तो गंगेला वचन देतो. यथावकाश शंतनू आणि गंगेचा विवाह होतो आणि त्यांना पहिले मूल होते. मूल झाल्याबरोबर ती त्याला लगेच पाण्यात सोडून येते. अशी एका पाठोपाठ सात मुले गंगा पाण्यामध्ये सोडते. दिलेल्या वचनामुळे शंतनू दु:खी व व्यथित होण्याशिवाय काहीही करू शकत नाही. असेच त्या दोघांना आठवे मुल होते आणि गंगा त्याला नदीवर घेऊन जाते पण ह्यावेळी मात्र शंतनूचा धीर सुटतो आणि तो तिला त्या मुलाला पाण्यात सोडण्यापासून कडाडून विरोध करतो आणि तिने असे का केले ह्याचा जाब विचारतो.

त्याबरोबर गंगा शंतनूने तिला दिलेल्या वचनाची आठवण करून देत त्या शेवटच्या मुलाला शंतनूकडे सोपवून स्वर्गात परत जाते. गंगेने जी सात मुले पाण्यात सोडली तेच हे सात वसू ज्यांना मानवजन्म मिळाल्यावर लगेचच मृत्यू येईल असा उ:शाप होता आणि शेवटचा वसू ज्याला गंगा पाण्यात सोडत नाही तो प्रभास सर्वांना 'देवव्रत' ह्या नावाने परिचित आहे. यथावकाश गंगा देवव्रतला स्वर्गामध्ये धनुर्विद्या आणि इतर शिक्षणासाठी घेऊन जाते आणि तो १६ वर्षांचा झाल्यावर पुढच्या पालनपोषण आणि शिक्षणासाठी परत शंतनूकडे सोडते. देवव्रताचे पुढचे शिक्षण श्री परशुरामांकडे होते आणि तो त्यांचा पट्टशिष्य होतो. हाच देवव्रत पुढे वडिलांच्या मागणीपोटी आजन्म ब्रह्मचारी राहाण्याची (म्हणजेच कधीही लग्न न करण्याची) "भीष्म" प्रतिज्ञा करतो आणि पुढे "भीष्म" ह्या

नावानेच तो ओळखला जातो. देवव्रताने घेतलेल्या ह्या प्रतिज्ञेने भारावून जाऊन शंतनू त्याला इच्छामरणाचे वरदान देतो. भीष्म पितामह महाभारतामुळे आपल्या सर्वांना परिचित आहेतच.

असे म्हणतात की पुढे शंतनू स्वर्गवासी झाल्यावर गंगा त्याची मनापासून क्षमा मागते आणि त्याला ही अष्टवसूंची कथा सांगते, ज्यामुळे तो तिला क्षमा करतो. पुढे भीष्म पितामह युद्धभूमीत बाणशय्येवर धारातीर्थी पडल्यानंतर उत्तरायण लागेपर्यंत प्राण सोडण्यासाठी थांबतात. युधिष्ठिर राजा झाल्यावर त्याला (पृथ्वीवर पहिल्यांदाच) विष्णू सहस्रनामाचा जप व त्याचे माहात्म्य सांगून, तसेच राज्यकारभाराचा उपदेश देऊन मगच प्राण सोडतात. असे म्हणतात की विष्णू सहस्त्रनाम हे तेंव्हापासून पृथ्वीवर प्रचलित झाले व पुढे पिढ्यानपिढ्या प्रसारित झाले.

तर अशी ही अष्टवसूंची कथा. तुम्ही पुढच्या कथेची उत्सुकतेने प्रतीक्षा कराल अशी आशा करते.

टीप :– हा लेख आंतरजालावरील असंख्य दुवे, जुनी पुस्तके, भारतीय यू.पी.एस.सी.परीक्षेच्या अभ्यासक्रमातील हाती लागलेली काही माहिती व सर्वात महत्त्वाचे म्हणजे माझ्या आजीने लहानपणी सांगितलेल्या काही कथांचा आधार घेऊन लिहिलेला आहे, तरी ह्यात त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भाषाविचार

# पळा, पळा, कोण पुढे पळे तो



वरदा वैद्य

माझी मैत्रीण अपर्णा वाईकर ही इथल्या मराठी शाळेत शिकवते. आम्ही गप्पा मारल्या आणि त्यात मराठी भाषेसंदर्भात काही चर्चा झाली नाही असे होत नाही. असेच एकदा बोलत असताना सकर्मक–अकर्मक क्रियापदांचा विषय निघाला. काही क्रियापदांना कर्माची गरज असते, त्याशिवाय क्रियेचा नेमका अर्थ स्पष्ट होत नसेल तर अशी क्रियापदे सकर्मक असतात. कर्माची गरज नसेल तर ती अकर्मक क्रियापदे असतात. उदाहरणार्थ, 'खाणे'. काय खाल्ले? असे विचारले की खाण्याचा नेमका अर्थ कळतो. मग ते भात/फळ वगैरे पदार्थ खाणे असेल, पैसा/लाच खाणे असेल, मार खाणे असेल वा हाय खाणे असेल. काय खाल्ले हे जोवर कळत नाही तोवर अन्नग्रहण, भ्रष्टाचार, शिक्षा, मानसिक/शारीरिक स्थिती ह्यापैकी नेमका कोणता अर्थ अपेक्षित आहे हे समजत नाही. करणे, लावणे, देणे, धरणे वगैरे बरीच क्रियापदे अशी कर्माची अपेक्षा करणारी असतात. वाक्यातल्या क्रियापदाला 'काय' असा प्रश्न विचारला की मिळणारे उत्तर म्हणजे कर्म असे आपण शाळेत व्याकरणाच्या तासाला घोकल्याचे तुम्हाला आठवत असेलच.

बसणे, चालणे, झोपणे वगैरे क्रियापदे अकर्मक आहेत, ज्यांना 'काय?' हा प्रश्न लागू होत नाही. धावणे क्रियापदालाही कर्माची अपेक्षा नसते. काय धावला? असे विचारण्यात अर्थ नसतो. फार तर कुठे धावला, का धावला, किती (अंतर) धावला असे प्रश्न विचारता येतील. पण मग 'ती मॅरेथॉन धावली' ह्या वाक्यात मॅरेथॉन हे कर्म आहे की नाही असा प्रश्न अपर्णाला पडला आणि आम्ही विचारांत पडलो. वरवर पाहता 'काय धावली?' तर 'मॅरेथॉन धावली', ह्या प्रशोत्तरात कानाला खटकेल असे काहीच वाटले नाही. मात्र अधिक विचार करता लक्षात आले की मॅरेथॉन हा शब्द अंतराचा निदर्शक म्हणून वापरला जातो. फिलिपिडेस ह्या ग्रीक निरोप्याने मॅरेथॉन ते अथेन्स हे २६.२ मैलांचे अंतर न थांबता पायी पार केले त्यावरून मॅरेथॉन हे नाव धावत/चालत तेवढे अंतर पार करण्याच्या स्पर्धेसाठी वापरतात. त्यामुळे 'काय धावली'पेक्षा 'किती धावली' ह्या प्रश्नाला 'मॅरेथॉन धावली' हे उत्तर असू शकते. म्हणजे ते कर्म नाहीच तर!

तर भाषेचा विषय निघाला की शब्दकोशाकडे 'धाव' घेणे आलेच. मग प्रश्न पडला की मी आत्ता जी शब्दकोशाकडे जात आहे ती धावतधावत की पळतपळत? शिवाय धावतपळत असा शब्दही आपण वापरतोच. शब्दकोश पाहता धावण्याचा अर्थ पळणे आणि पळण्याचा धावणे दिलेला सापडेल. मग धावणे आणि पळणे एकच की त्यात अर्थच्छटेचा काही फरक असेल? काही ठिकाणी धावणे म्हटले काय किंवा पळणे म्हटले काय, काहीच फरक पडत नाही. पण 'ती मला मदत करण्यासाठी धावत आली' हे वाक्य आपण 'ती मला मदत करण्यासाठी पळत आली' असे सहसा म्हणत नाही. देवाने भक्तांच्या हाकेला 'धावून' यावे म्हणून भक्त देवाचा 'धावा' करतो तेव्हा देवाने भक्तांच्या हाकेला 'पळून' यावे असे आपण म्हणत नाही. रणांगण सोडून जायची वेळ येते तेव्हा सोडणारा पळून जातो, धावून नव्हे. चोरही पळून जातो.

माझे असे निरीक्षण आहे की जेव्हा एखाद्या ठिकाणी, व्यक्तीकडे वा लक्ष्याच्या दिशेने वेगात जायचे असेल तर आपण धावून जातो, पण एखाद्या स्थानापासून, व्यक्ती वा परिस्थितीपासून वेगात दूर जायचे असेल तेव्हा आपण पळून जातो. निश्चित गंतव्य स्थानाच्या वा इष्टस्थानाच्या दिशेने वेगाने जाणे म्हणजे धावणे तर अनिष्टस्थानापासून वेगाने दूर जाणे म्हणजे पळणे. म्हणजे कुठे जायचे आहे हे ठरलेले असेल तर त्याकडे धावायचे आणि कशापासून लांब जायचे आहे हे ठरलेले असेल तर तिथून पळायचे, असे असेल का?

उशीरा पोहोचल्यामुळे आपण 'धावती' झुकुझुकू अगीनगाडी पकडतो तर गाडीत बसल्यावर 'पळती' झाडे पाहू या म्हणतो. 'धावतपळत' बस पकडली म्हणण्यामागे बसच्या दिशेने धावण्याबरोबरच घरापासून दूर जाण्याचाही एकत्रित निर्देश होतो. अर्थात हा काही लिखित नियम नव्हे, पण तुम्हाला माझे निरीक्षण योग्य वाटते का?

संस्कृतातल्या धाव् आणि पल् ह्या धातूंपासून अनुक्रमे धावणे आणि पळणे ही मराठी क्रियापदे आली आहेत. धावणे क्रियापदापासून तयार झालेले धावती/धावता (उदा. धावती गाडी), धावरी/धावरा (उदा. धावरा मुंगळा), धावण/धावणी (अर्थ पाठलाग (मराठी शब्दरत्नाकर, दाते शब्दकोश)), तसेच धावदोरा, धाव, धावा, धावपट्टू, धावाधाव, धावपळ वगैरे शब्द आपण नेहमी वापरतो. पळणे क्रियापदापासून तयार झालेले पलायन, पलायनवाद (escapism), पळपुटा/पळपुटी, पळवाट, पळापळ वगैरे शब्दही आपल्या वापरात आहेत. सळो की पळो करण्यातही पळण्याचा संदर्भ आहे.

कृ. पां. कुलकर्णीकृत मराठी व्युत्पत्ती कोशानुसार धावणे ह्या क्रियापदाचे दोन अर्थ आहेत. एक धांवणे म्हणजे पळणे आणि दुसरा धावणे म्हणजे धुणे, स्वच्छ करणे. ह्या कोशानुसार "धांवणे (=पळणे) आणि धावणे (=धुणे) हे एकाच मूळ धातूपासून आले आहेत. धावण्यामध्ये गतीचा संदर्भ आहे. त्यावरून धार–धो धो ह्यामध्यें प्रवाहाचा म्हणजे गतीचाच संबंध आहे. त्याचा परिणाम धुणे, धावक (परीट), दंतधावन ह्यांतील 'धुणे' ही क्रिया." वाहण्यामध्येही गतीचा संदर्भ आहे. पळपळीत म्हणजे ढिला (शब्दरत्नाकर, वझे, दाते).

धाव हे नाम आपण विविध अर्थांनी वापरतो. 'सरड्याची धाव कुंपणापर्यंत' ह्या वाक्प्रचारात धाव म्हणजे पळण्याची मजल, मर्यादा वा आवाका (मराठी शब्दरत्नाकर). (बैल वा घोडा)गाडीच्या चाकांभोवती असणाऱ्या लोखंडी पट्टीला धाव (शब्दरत्नाकर, शुद्ध मराठी कोश) म्हणतात. मोटेच्या बैलाला चालावा लागणारा प्रदेश म्हणजेही धाव (शब्दरत्नाकर). क्रिकेटच्या खेळात जास्त धावा काढणारा चमू जिंकतो.

धावा हे धाव ह्या नामाचे अनेकवचन आहे, तसाच तो स्वतंत्र शब्दही आहे. भक्त देवाचा धावा करतो म्हणजे संकटसमयी मदतीला येण्यासाठी विनवणी (दाते) वा प्रार्थना (शब्दरत्नाकर) करतो. मराठी व्युत्पत्तीकोशानुसार "धांवा! धांवा! असे ओरडूनच मनुष्य दुसऱ्यास साहाय्याला बोलावतो त्यावरून" धावा हा शब्द आला आहे. ह्या कोशात कोशकार लिहितो की हेमचंद्राच्या लेखनानुसार धावा हा देशी शब्द आहे. हेमचंद्राच्या वेळेपर्यंत धाव् हा (प्राकृत) धातू संस्कृत समजला जात नसावा असे अनुमान व्युत्पत्तीकोशकारांनी काढले आहे.

धावण्या आणि पळण्यासोबत आणखी एक क्रियापद वापरले जाते ते म्हणजे भागणे. हिंदीत भागना म्हणजे धावणे हा शब्द जेवढा प्रचलित आहे तेवढा तो मराठीत धावणे ह्या अर्थाने प्रचलित नाही. मराठीत 'भागणे' क्रियापदाचे अनेक अर्थ होतात – धावणे वा पळणे (भिऊन पळून जाणाऱ्या व्यक्तीला भित्री भागुबाई म्हणतात), भाग करणे वा विभाजन करणे वा वाटणे (सहाला तिनाने भागल्यास दोन हे उत्तर मिळते), थकणे (दमून–भागून), पुरेसे पडणे (महिन्याच्या पगारात आमचा घरखर्च भागतो) वगैरे. थकणे–भागणे आणि पुरेसे पडणे ह्या 'विभागण्या'च्याच अर्थच्छटा आहेत. आपण दमतो भागतो म्हणजे आपली शक्ती, लक्ष आणि व्यवधान किंवा आपले शरीर आणि मन विविध कामे आणि कामासंबंधी विचारांमध्ये विभागले जाऊन शिणते. घरखर्च पगारात भागतो म्हणजे मिळालेल्या पगाराची विविध गोष्टींसाठी लागणाऱ्या खर्चात विभागणी होताना पगार पुरेसा पडतो.

'चांदोबा चांदोबा भागलास का' ह्या बडबडगीतात 'भागलास का'चा अर्थ तुमच्या मते काय आहे? चंद्र आकाशात पूर्वेकडे उगवून पश्चिमेला मावळतो, म्हणजे तो आकाशात 'धावतो' असा अर्थ आहे, की तो रोज उगवती–मावळतीला धावपळ करून 'दमतो'

आणि लिंबोणीच्या झाडामागे विसाव्याला थांबतो, म्हणून लपल्यासारखा वाटतो – असा अर्थ आहे? की कलेकलेने कमी होत जात ('विभाजन') अमावस्येला आकाशातून गायब होतो आणि म्हणून लिंबोणीच्या झाडामागे लपल्याची कल्पना ह्या बडबडगीतकाराने केली आहे? कोणताही अर्थ घेतला तरी तो योग्यच वाटतो.

काळ हा सतत गतिमान असतो. काळानुसार जो पुढे पुढे पळत राहातो त्याची प्रगती होते असे काही मानतात, तर काहींना जीवनाची गतिमान स्पर्धा निरर्थक, दमछाक करणारी वाटते.

पळा पळा कोण पुढे पळे तो
आणखी मागुनी थांबूनी कोण नष्ट होतो!

माधव ज्युलियन म्हणतात,

कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला, थांबला तो संपला!
धावत्याला शक्ति येई आणि रस्ता सापडे. भ्रांत तुम्हां कां पडे?

संदर्भ :–

मराठी बृहदकोश – https://bruhadkosh.org/
मराठी व्युत्पत्ति कोश – कृ. पां. कुलकर्णी, शुभदा–सारस्वत प्रकाशन, १९९३.
मराठी शब्दरत्नाकर – कै. वा. गो. आपटे, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, २००२
महाराष्ट्र शब्दकोश, दाते–कर्वे शब्दकोश, य. रा. दाते आणि चिं. ग. कर्वे, महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणे
शुद्ध मराठी कोश – वि. रा. बापट आणि बा. वि. पंडित, जगहितेच्छु छापखाना, १८९१

# संगीत आणि बरंच काही



मैत्रेयी कुलकर्णी

लहानपणीची गोष्ट आहे. तेव्हा मला भूप राग वाजवता यायचा. भारी वाटायचं. मी आल्या गेलेल्यांना वाजवून दाखवत असे. बिचारे लोक! कौतुकाने माना डोलवायचे. गोष्ट जुनी आहे. असो. पुढे काही फार प्रगती झाली नाही, तरी ह्या आरोह अवरोहासकट माहित असलेल्या एकुलत्या एका रागाबद्दलचं प्रेम काही कधी कमी झालं नाही. म्हणूनच जेव्हा पहिल्यांदा 'सहेला रे' ऐकलेलं तेव्हा अगदी नैसर्गिकरित्या त्या गाण्याच्या, आवाजाच्या आणि पर्यायाने गायिकेच्या प्रेमात पडणं साहजिक होतं.

एक काळ, जेव्हा मोठमोठ्या घराण्यांच्या ठळक रेषांनी बांधलेली गायकी एकदा ऐकून (Trendy you know! You see...मी फक्त क्लासिकलच ऐकते!), नीरस वाटून सोडून द्यायचा काळ होता तेव्हा त्याच्याच आसपास 'सहेला रे'तल्या फक्त 'सा'साठी ते गाणं शेकडो वेळा ऐकल्याच्या आठवणी आहेत. अजूनही तो पहिला सा लागला की ओठावर आपसूक जे 'वाह' येतं ना...तशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया माझ्या मनात खूपच कमी गाण्यांसाठी येते. असंच आज झालं ते किशोरीताईंचा गौड मल्हार ऐकताना! त्यातल्या 'सजनिया'तला लडिवाळपणा ज्याच्यापर्यंत खरंच पोहोचला ना, ती गायकी त्याच्यासाठीच! दैवी.

तरी आजच्या लेखप्रपंचाचं कारण म्हणजे कालचा दिवस, जो ह्या ना त्या कारणाने किशोरी आमोणकरमय झालेला. मिया की तोडी ने सुरू झालेल्या दिवसाचा सूर्य मिया की मल्हारच्या वर्षावात भिजत शेवटी भिमपलासीत मावळला, तोपर्यंत अवघा रंग एक होऊन गेलेला. रात्री एका मित्राने गौड मल्हार शेअर केलेला. आज सकाळी तो ऐकताना जी समाधी लागली त्यानंतर मी फक्त "हमिनस्तो हमिनस्तो" एवढचं म्हणू शकले. मला रागदारीतलं कळत वगैरे नाही बरं का! वरचे राग आणि गायकी ही फक्त "छान वाटतं" ह्या शीर्षकातंर्गत येणारी आणि म्हणून ऐकली जाणारी!

तर ही "छान वाटतं" ची यादी बदलत असते. त्यात काहीच्या काही भर घातली जाते आणि अगदीच काहीच्या काही असेल तर ते आपसूक कमीपण केलं जातं. त्यात अनाकलीय अरेबिक, इटालियन गाणी असतात, रविंद्र संगीत, कर्नाटकी स्वर असतात, कुठून तरी हुडकलेले बँड, धांगडधिंगा असतो (कोणे एकेकाळी एक अख्खा आठवडा मी अफगाण जलेबी खात होते!! का? अर्रे, आली लहर केला कहर!), जगाच्या पाठीवरचे Acappella Group, सिद श्रीराम, कोक स्टुडिओ, द बीटल्स, सायमन अँड गारफंकल, 70s jazz असतं, 'रात के ढई बजे'वाले सुरेश वाडकर, गाणारं व्हायोलिन, कुमार गंधर्व, वसंतराव, अरियाना ग्रान्दे, गुलाम अली पण असतात, cello covers, Gibson Les Paul guitar (जे एका गायकाच नाव आहे असा अतिशय वाईट विनोदी गैरसमज माझा सुरुवातीला झालेला) येत जात असतात.. हे मारुतीचं शेपूट! न संपणारं .. त्याचा वावर सगळीकडे.

ह्या आवडण्याची एक व्याख्या नाही. त्या व्याख्येची व्याख्या तशी सर्वव्यापी. नवं ते ऐकत जावं, झिरपू द्यावं. रुचलं तर ऐकत राहावं नाहीतर असो म्हणून सोडून द्यावं. इतकं साधं सोपं ह्यामागचं गणित. त्यातून कधी खजिना सापडतो, आपल्या अक्षय्यपात्रासारख्या पोतडीत अखंड भर घालत राहतो. तर कधी मृगजळाच्या हव्यासात फसल्यासारखं पण वाटतं. कारण कधीतरी त्याचं फारशी मुळं नसलेलं, बिनचेहऱ्याचं पसरलेपण अस्वस्थ करतं. ह्या विखुरलेल्या यादीत आपल्या भारतीय मातीची मुळं कोरडी पडत नाहीयेत ना असं वाटतंच. "मला काय आवडतं?" ह्याचं उत्तर कधीतरी "मला सगळं आवडतं" हे कितीही विलोभनीय वाटत असलं तरी आवडीच्या पलीकडचा वरचा सा आपल्याला कितीतरी दिवसात कशानेच लागला नाहीये, जीव टाकावा असं काही आत्ताच्या आत्ता सुचणार नाहीये; ही जाणीव तितकीशी विलोभनीय नसतेच. तो वरचा सा भैरवीसारखा. त्याची हुरहूर, मैफिल संपताना

अस्वस्थ वाटणारी जाणीव खरी असली तरी परतायला आपलं घर आहे कुठेतरी हा विश्वास किती दिवसात अनुभवला नाहीये. ह्याचा हिशोब लावायला मन जुन्या कुठल्यातरी काळात पोहोचायच्या तयारीला लागावं म्हणतं आणि तेवढयात लांबून कुठुनतरी फ्रँक सिनात्रा 'The way you look tonight' म्हणतो आणि मृगजळ गायब व्हायला लागतं. नंतर पुन्हापुन्हा 'call of the valley' चे सूर लागतात आणि मारुतीची शेपूट अजून वाढायला लागते. भैरवीसाठी मैफिल संपावी लागते म्हणतात ना! आपली गोष्ट त्यातली नाही ह्यावर फक्त खूणगाठ बांधली जाते.

हे फक्त माझचं नाही, सगळ्यांचंच असेल का? सगळं आवडत असतं आणि त्यात घर शोधायची धडपड असते. दुसऱ्यांनी दाखवलेल्या भावनांच्या जंजाळात स्वतःसाठीचा आरसा शोधायचा अट्टहास नवनव्या वाटांवर आणून सोडतो. काही वाटा चालताचालता मधेच गायब होतात तर काही तयार व्हायच्या आधीच मातीमोल होतात. काही अगदी "हेच की ते!" असा अनुभव देतात तर काही वाटा आपलं घरच बनून जातात. प्रत्येक वाटेचे अनुभव वेगवेगळे पण ते प्रवासाला संपन्न बनवतात आणि आरसा शोधायची गरज कमी होत जाते.


प्रागच्या पुलावर हिमवर्षावात अनुभवलेला स्थानिक कलाकारांचा कार्यक्रम

वैश्विक संगीत मनात पोहोचतं आणि विश्वसंचार करताना अगदी हवं ते लहानपणी ऐकलेलं, जुनं गाणं गुणगुणलं जातं तेव्हा नकळत कळतं की आपण आपली मुळं घेऊनच फिरतोय. ते संगीत कुठे विशिष्ट मातीत नाही तर मनात रुजलेलं आहे.


लिंकन मेमोरियलजवळ अनुभवलेला कार्यक्रम

मोझार्टच्या साल्सबर्गमध्ये संध्याकाळी ऐकलेली सिम्फनी, प्रागच्या पुलावर हिमवर्षावात अनुभवलेला स्थानिक कलाकारांचा कार्यक्रम, कलाकारांच्या फ्लॉरेन्समध्ये एकलेलं, उत्कटतेची परिसीमा असलेलं व्हायोलिन, अगदी परवा डीसीला लिंकन मेमोरियलजवळ अनुभवलेला सांगीतिक कार्यक्रम आणि असं बरचं काय काय.. कान उघडे असले की मनाची कवाडं उघडायला वेळ लागत नाही.

ह्याच तथाकथित वैश्विक मनाला आयफेल टॉवरवरुन सूर्यास्त पाहाताना "संधीप्रकाशात अजून जो सोने.." आठवतं, बुडापेस्टला नदीकिनारी फेरफटका मारताना भूपेन हजारीकांचं "ओ गंगा बेहती हो क्यूँ.." साद घालतं, कुठल्यातरी इटालियन समुद्रावर किशोरकुमारचं "सागरकिनारे…" अस्वस्थ करतं.

ऊनपावसाचा खेळ चालू राहतो.. त्यात एकदा भिजलेलं मन कधी कोरडं मात्र होत नाही.

ह्या सगळ्याची सुरुवात झालेली किशोरीताईंच्या गाण्यांनी. त्या गेल्या तेव्हा मी आयुष्यात पहिल्यांदा भारताबाहेर होते आणि मला चांगलं आठवतयं, तो त्या काही अतिशय मोजक्या दिवसांपैकी एक होता; जेव्हा मला खरोखर एकटं वगैरे वाटलं असेल, लांब आहोत आपण ही जाणीव तेव्हा पहिल्यांदा अंगावर आलेली.. उगाच! वैश्विक संगीताला तयार होण्याची माझी सुरुवात माझ्याही नकळत त्यांच्याच तर गाण्यापासून झालेली आणि तरी त्या एका काळात विसरलेले मी त्यांना. कदाचित त्याचं दुःख जास्त असेल. कदाचित..... कारण कधीकधी काय गमावतोय हे नक्की माहित नसलं की त्या गमावण्याचं दुःख जास्त साजरं केलं जातं. कारण तेव्हा ते दुःख एकटं न रहाता अनेक निद्रिस्त कारणांना जागं करतं. असो!!

तो विषय वेगळा. हे तत्वज्ञान परत कधीतरी (हा हा, आमचे घोडे उधळलेलेच असतात कायम तसे.)

असो. तर आजची ताजी बातमी अशी की ऐकत रहा, नव्या जुन्या वाटा ढुंढाळत रहा. फार सुंदर आहे सगळं! ऐकवत रहा!
तुम्ही काय ऐकताय सध्या? मला नक्की सांगा!

# परसातले पक्षी



सपना औटे

फोटो काढणे हा नेहमीच माझा छंद राहिला आहे. याची सुरुवात माझ्या आयफोनपासून झाली. फोनचा हा एक कॅमेरा नेहमी माझ्या खिशात असतो. काही वर्षांपूर्वी, जेव्हा पक्षी आमच्या घरामागील फीडरवर येऊ लागले, तेव्हा मी माझा DSLR उचलला. आणि माझा छंद एक उत्कट आवड बनला. माझ्याकडे आता घरामागील पक्ष्यांच्या फोटोंचा संग्रह आहे आणि त्यातील काही पक्षी त्यांच्या आवाजावरून मी ओळखू शकते. मला निसर्ग छायाचित्रणाची खूप आवड आहे. तुम्हा सर्वांना आगामी अंकांत काही फोटो पाहायला मिळतील.


(पक्ष्यांची मराठी नावे 'शब्दानंद' कोशातून घेतली आहेत. शब्दानंद – त्रैभाषिक व व्यवहारोपयोगी विषयवार शब्दकोश, कोशरचनाकार – सत्त्वशीला सामंत, डायमंड पब्लिकेशन्स, २००७.)



सोनेरी चटक पक्षी (GoldFinch)



कॉमन हाऊस फिंच



ब्लू जे


लाल पोटाचा सुतार(Red Bellied Woodpecker) आणि तपकिरी डोक्याचा गोरक्ष पक्षी(Brown Headed Cow Bird)


मदनसारिका वा तिलोरी मैना (Starling)


काळ्या डोळ्यांचा चरचटक (Black Eyed Junco)


नॉर्दर्न कार्डिनल नर, (डावीकडे) आणि मादी (उजवीकडे)

# कवितेचं पान – शिशिरागम



अनिल मायभाटे

संध्याकाळची थंड चाहूल लागते आहे. मी हा असा हातात वाफाळता चहाचा कप घेऊन घराच्या गच्चीवर बसलो आहे. उतरत्या उन्हाच्या कातर प्रकाशात झाडांच्या वाळलेल्या फांद्या, पानं बघत. थोड्याशा झुळकेनेही समोरच्या एका वयोवृद्ध दिसणाऱ्या झाडाची काही वाळलेली पानं वाऱ्यावर तरंगत माझ्यापर्यंत पोहचतात. मन आपोआपच एक जुनी जिव्हाळ्याची कविता वाचायला लागतं.

*शिशिरर्तुच्या पुनरागमें,*
*एकेक पान गळावया*
*कां लागता मज येतसे*
*न कळे उगाच रडावया.*

सूर्यास्त लवकर व्हायला लागलाय आताशा. उत्तरेकडून येणारे थंड बोचरे वारे हिवाळ्याची चाहूल देताहेत, पण अजून पानगळ सुरूच आहे. अशा वेळी एखाद्या उदास रागाची आलापी सुरु व्हावी तशी ही कविता हळूहळू मनात साचत जाते, एक एक उदास सूर उमलवत जाते. मेंदूत अचानक जाग्या झालेल्या आठवणी नकळत डोळ्यांतून गालावर उतरायला लागतात...

कसली कविता आहे ही? हिवाळ्यातल्या पानगळीची, की एखाद्या उदास एकट्या संध्याकाळची? की आणखी काही? कुठली संध्याकाळ? सूर्यास्त होऊन आणखी एक दिवस संपला हे सांगणारी? की वय वाढत गेलं तशी आता आयुष्याला लागलेल्या उतरणीची जाणीव करून देणारी?

*पानांत जीं निजलीं इथे*
*इवलीं सुकोमल पाखरें,*
*जातील सांग अता कुठे?*
*निष्पर्ण झाडिंत कापरे !*

आठवणी अनंत आहेत. असतातच. त्यांचं असं हे मोहोळ उठलं की प्रश्न पडतो, काही "सुकोमल पाखरें" मीही कधीतरी मेंदूच्या घरट्यात जमा केली होती, ती आता या घोंगावणाऱ्या, बोचऱ्या वादळात, या पानगळीच्या ऋतूत कुठे उडून जातील? या प्रश्नासरशी झाडांच्या उरल्या सुरल्या वाळल्या फांद्यांमधून एक थंड भीतीचं कापरं भरतं. एक एक करून गळत जाणाऱ्या काही वृद्ध पानांच्या आठवणीने.

ही कविता फक्त निसर्गचक्राची नक्कीच नाही. आयुष्याच्या संध्याकाळचीही नाही. दूर देशी एकट्या पडलेल्या प्रवाशाच्या मनात, आयुष्यात पूर्वी येऊन गेलेल्या साथीदारांच्या आठवणींची आहे? कदाचित, तरुण वयात उमलत जाणाऱ्या भविष्यातल्या महत्त्वाकांक्षा, भावभावना, ज्या आता अपयशाच्या जाणिवेखाली हळू हळू मिटत जाताहेत, अशा एक एक बंद होणाऱ्या दरवाजांची? शेवटी या सर्वांतून उरणाऱ्या, थंड बोचऱ्या एकटेपणाची आणि एखाद्या उदास संध्याकाळी त्या एकांताला सुटत जाणाऱ्या अर्थाच्या अनेक पदरांची...

*फुलली असेल तुझ्या परी,*
*बागेंतली बकुलावली;*
*वाळूंत निर्झर–बासरी;*
*किति गोड ऊब महीतलीं !*

एकांताच्या असल्या बोचऱ्या क्षणी कधीतरी दिलासा देऊन गेलेल्या काही मोजक्या जीवलगांची, कधी ओरखडे उमटवून गेलेल्या आपल्याच काही माणसांची आठवण अटळ आहे. ते सगळेच आता भूतकाळात गेलेल्या हिरव्यागार ऋतूप्रमाणे फार दूर, मागे पडलेत. तरीही त्यांच्या दारात तेंव्हा फुललेला तो बकुळवृक्ष आपल्या मेंदूत अजूनही तसाच हिरवागार आहे. इथे आपल्या अंगणात या थंड वाळलेल्या पाचोळ्याचं राज्य सुरु झालंय तेंव्हा त्यांच्या दारात तो जिवंत रसरसता हिरवागार ऋतू तसाच नांदत असेल कदाचित....

*येतील हीं उडुनी तिथे,*
*इवलीं सुकोमल पाखरें,*
*पानांत जीं निजलीं इथे.*
*निष्पर्ण झाडिंत कांपरे !*

आपल्या मनात जन्म घेणारी ही आठवणींची 'इवली सुकोमल पाखरं' उबदार घराच्या शोधात दूरवर उडत जाऊन, त्या सतत फुलणाऱ्या बकुळवृक्षाच्या हिरव्या सावलीत नवीन घरटं करतील कदाचित...

अनेक प्रश्नांचं मोहोळ उठत राहातं. आठवणी तशाच गालावर उतरत राहतात. संध्याकाळ अजून थोडी गडद होते. पानगळ सुरूच राहते.

*पुसतों सुहास, स्मरूनिया*
*तुज आसवे, जरि लागलें*
*एकेक पान गळावया*
*शिशिरर्तुच्या पुनरागमें.*

अचानक हाताला चटका जाणवतो. तो चहाचा कप अजूनही हातात तसाच वाफाळतोय. कसाबसा चहा संपतो. मनात क्षणभरच उघडलेलं कवितेचं पान परत मिटून बंद होतं..

# लेन्सच्या मागे



प्रिया जोशी

माझे नाव प्रिया जोशी. मी माझ्या लेन्सद्वारे खऱ्या भावना आणि जीवनाच्या अभिव्यक्तीसह खास क्षण पकडते आणि त्यांना नाविन्यपूर्ण रीतीने रूपांतरित करते. मला वास्तविक जीवन दाखवायला आवडते. हे असे क्षण आहेत जे आपण कायमचे लक्षात ठेवू शकतो.

मी १९९८मध्ये सर जे जे स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई येथून फोटोग्राफी डिप्लोमा प्रशिक्षण पूर्ण केले. प्रत्येक नवीन प्रकल्प हे एक नवीन आव्हान असते आणि ते शक्य तितक्या वास्तविकपणे साकार करण्याचे ध्येय असते. विषय जाणून घेणे, वास्तविक संवाद पकडणे आणि त्यांची कथा सांगणे हे मला खूप ऊर्जा आणि प्रेरणा देते.'बर्ड फोटोग्राफी' विषयांतर्गत मी काढलेले काही फोटो प्रकाशित करत आहे.

माझ्या कलेला प्रोत्साहन दिल्याबद्दल मी मैत्र सहकारी टीम आणि बाल्टिमोर मराठी मंडळाची खूप आभारी आहे.



**नकल्या पक्षी (Mockingbird)**

कॅरी, नॉर्थ कॅरोलिना, एप्रिल २०१२
अधिक माहितीसाठी पाहा:
[www.meaningguru.com/en-mr/mockingbird](www.meaningguru.com/en-mr/mockingbird)



**टकला गरुड (Bald Eagle)**

कोनोविनगो धरण, मेरीलँड;
डिसेंबर २०२०
अधिक माहितीसाठी पाहा:
[https://mr.wikipedia.org/wiki/टकला_गरुड](https://mr.wikipedia.org/wiki/टकला_गरुड)




कैकर (Osprey)

जॅकसनविल, फ्लोरिडा; डिसेंबर २०१९
अधिक माहितीसाठी पाहा:
https://mr.wikipedia.org/wiki/कैकर



व्हाईट नेप्ड सुतार पक्षी. (White Naped Woodpecker)

कोकण, महाराष्ट्र; जानेवारी २०२०.
अधिक माहितीसाठी पाहा: https://inmarathi.net/woodpecker-information-in-marathi/




नीलिमा किंवा नीळ पक्षी (Eastern Bluebird)

ब्लॅक हिल पार्क, बॉईड्स, मेरीलँड, डिसेंबर २०२०
अधिक माहितीसाठी पाहा:
https://mr.wikipedia.org/wiki/निलीमा_(पक्षी)



हंसक पक्षी/रोहित पक्षी (Flamingo)

भिगवण,महाराष्ट्र, फेब्रुवारी २०२०
अधिक माहितीसाठी पाहा:
https://mr.wikipedia.org/wiki/रोहित_(पक्षी)



मिलिंद पदकी

## जाडू आणि भुत्या यांची गोष्ट

"अगं, काय ठरवलंय तुम्ही शेवटी? लग्न करणार आहात की नाही?" तिच्या आईने विचारले.

"अगं, प्रॉब्लेम वेगळाच आहे. आमच्या मांजरांचं अजिबात पटत नाही एकमेकांशी... कसं राहणार ना मग एकत्र?"

"इश्श. एव्हढंच ना! आमच्याकडे आणून ठेव की तुझा बोका!" आई उदारपणे म्हणाली.

आतल्या खोलीत बाबांची मुद्रा हताश झाली. पण त्यांनी "नको, नको!" अशी हलविलेली मान कोणालाच दिसली नाही.

"तुझ्या कुत्र्याशी तरी कुठं जमतंय जाडूचं?" मुलीने नवा आक्षेप काढला.

"अगं, त्यांना वेगवेगळ्या खोलीत कोंडून ठेवीन की मी! तुझी तिशी आली आता..." आई चिंतेच्या स्वरात म्हणाली.

"तो काय तरुण होतोय की काय? चौतीस होईल पुढच्या महिन्यात. पोट सुटत चाललंय नुसतं!"

"तेच म्हणतेय मी. लग्न करा आता– म्हणजे मी सुटले..."

" तुला नक्की कुठे “धरलं”य ग मी?" मुलीने परत उडवाउडवी सुरु केली.

"त्याला करायचंय ना नक्की तुझ्याशी लग्न?"

"हो! हो! हो! दहा वेळा तरी त्यानं विचारलं असेल मला."

"मग प्रॉब्लेम काय आहे तुला?"

"त्याची गाडी पाहिलीस का? दहा वर्षांची जुनी टोयोटा आहे. माझ्या मैत्रिणी हसतील मला!"

"चल, आम्ही घेऊन देऊ तुम्हाला नवीन गाडी लग्नात..."

"नको, त्याचा ना, लगेच अपमान होतो..."

बॉयफ्रेंडची जुनी गाडी, जुनेच मांजर हे प्रश्न न सुटणारे नक्कीच नव्हते. जाडू आणि भुत्या या दोन्ही बोक्यांचे स्वभाव त्रासदायक होते हे खरेच होते, पण तिचे आई–बाबा हे सगळे सहज हाताळू शकणाऱ्यांपैकी होते.

"जाडूला ठेवून घ्यायला आई तयार आहे... " मुलगी त्या संध्याकाळी ‘चक्रम’ला म्हणाली.

चक्रम–आर्यन चा चेहरा आनंदला.

"मग, काय ठरवलंयस तू?"

"अरे रोज चाळीस मैल ड्राइव्ह करावं लागेल मला, कामावर जायला... गाडी जुनी झालीय माझी!"

"मग घेऊ की नवीन एक, इतकं काय?" चक्रम म्हणाला.

"आई लग्नात द्यायची म्हणतेय..पण तुला ते चालेल का?" मुलीने भीत भीत विचारले.

चक्रमचा चेहरा पडला. "हे बघ, तुला काय हवं ते कर. नवी गाडी तुझ्या नावावर ठेव म्हणजे झालं." तो तुटकपणे म्हणाला.

"हे बघ, तू असा ऍटिट्यूड घेणार असशील तर मग आपल्याला प्री–नप करावं लागेल.. नाहीतरी आपण त्याबद्दल बोललो होतोच..."

"चालेल की. करूनच टाकूया.."

xxxxxx

महागड्या वकिलाच्या पॉश ऑफिसमध्ये सगळे जमले होते.

"मला जमलं  तेव्हढं लिहून काढलंय मी. पहिला मसुदा समजा..." वकील बिचकत बिचकत म्हणाला.

"वाचा की..." मांडीवर बसलेल्या जाडूला सांभाळीत आई म्हणाली.

"लग्नानंतर जाडू हा बोका, मैत्रेयीच्या आईवडिलांच्या घरी राहील. आईवडिलांना कुठे प्रवासाला जायचे असल्यास त्या काळात तो आर्यन–मैत्रेयीच्या घरी आणला जाईल. तेंव्हा त्या घरातील मूळ बोका भुत्या हा आर्यनच्या आईवडिलांकडे ठेवला जाईल. मैत्रेयीच्या आई–वडिलांनी दिलेल्या गाडीतून फिरण्यास आर्यन नाक मुरडणार नाही. तसेच मैत्रेयीच्या मैत्रिणींकडे जाताना नवीच गाडी वापरली जाईल."

सर्वांनी माना डोलाविल्या.

"हे ठीक आहे? आणखी काही मॅटर आहे?" वकिलाने विचारले.

“आपण माझ्या आईवडिलांना विश्वासात घेतलेलं नाही, पण  ते मी मॅनेज करीन .." आर्यन  म्हणाला.

प्रिंटआउटवर सर्वांच्या सह्या झाल्या.

वकिलाच्या ऑफिसबाहेर पडल्यावर आई म्हणाली, "अगं आज ना, मी जाडू आणि भुत्या, दोघांसाठीही बो–टाय आणलेत लग्नात घालायला .."

" क्यूट ! " चक्रम– मैत्रेयी  एका सुरात  म्हणाले!

xxxxxx

ढमढम तर तसे थाटातच झाले. जाडू आणि भुत्या बो टाय लावून भाव खात फिरत  होते.

भुत्याला आर्यनच्या आणि जाडूला मैत्रेयीच्या आईवडिलांकडे ठेवून आर्यन–मैत्रेयी इटलीला आठवडाभर हनिमूनला जाऊन आले.

परत आले तेंव्हा जे अद्भुत त्यांना दिसले त्यातून अनेकांचा लग्नसंस्थेवरचा गेलेला विश्वास परत आला.

मैत्रेयीच्या आईच्या घरी जाडू –भुत्या शांतपणे एका सोफ्यावर बसले होते.

आसपास कुठेही रक्त, तोडलेली फर, कानाचे तुकडे, वगैरे काहीही दिसत नव्हते.

आर्यन–मैत्रेयी आ वासून बघत राहिले.

"अगं, आर्यनच्या आईंना अचानक भुत्याच्या केसांची ऍलर्जी सुरु झाली. अगदी इमर्जन्सी केअरमध्ये जावं लागलं.

मग म्हटलं मी की त्याला इकडेच आणून ठेवा.. " मैत्रेयीची आई सांगत होती.

# धुक्यातले पैसे



रोहित कोल्हटकर

शांता शेळकेंच्या ‘धुक्याची माणसे’ ह्या कवितेवर आधारित विडंबन

धुक्याची माणसे

धुक्याची माणसे धुक्यात भेटतात
दिसतात न दिसतात धुक्यातच मिटतात

धुकेच धुके मागेपुढे, खालीवर,
दरम्यान हेलकावत असतात धुक्याचे दाट थर,
धुक्याची माणसे बोलतात जिवाच्या आकांताने,
करतात हातवारे कासावीस होऊन, थरथरतात भयाने.

धुके हलते, धुके उसळत राहते,
धुक्याच्या लाटा, धुक्याचेच वारे वाहते,
धुक्याची माणसे हात पुढे करतात
बोटांच्या फटीत फक्त धुकेच धरतात
शब्दांचेही बनते धुके
मनातले उत्कट आशय राहतात मुके

धुक्यातले पैसे

Stocksमध्ये मिळालेले पैसे बँकेतच दिसतात
दिसतात न दिसतात बँकेतच मिटतात

पैसेच पैसे खालीवर
दरम्यान हेलकावत असतात शेअर बाजाराचे कल
गुंतवणूकदार नजर ठेऊन असतात रात्रंदिवस
असा आलेख तसा आलेख, विश्लेषणांत लागतो बुद्धीचा कस

पैसे हलतात, पैसे उसळत राहतात
बँकेतील खात्यांचे आकडे, खात्यांतील व्यवहार वाढतात
गुंतवणुकदार अपेक्षा फुगवत जातात
नफ्याचे फक्त आभास खात्यात वाढवतात
बचतीची रक्कमही शेवटी आभासात विरते
खाते राहते पूर्ण रिते

तात्पर्य: Stocksमध्ये
झालेला नफा वेळच्यावेळी काढून घ्या

## जीवनशैली



बाळकृष्ण पाडळकर,
ट्रॉय, मिशिगन

१८९३ सालची गोष्ट आहे ही. त्यावेळी स्वामी विवेकानंद जागतिक धर्मपरिषदेसाठी अमेरिकेत आले होते. शिकागो येथील धर्म परिषदेमध्ये त्यांनी हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले. आपल्या अजरामर भाषणाने त्यांनी जगातून आलेल्या धर्मपंडितांची मने जिंकली. धर्मपरिषद संपल्यानंतर त्यांचा अमेरिकेत पाच वर्षे मुक्काम होता. हिंदू धर्माची मूलतत्वे जगाला पटवून देतांना त्यांनी अमेरिकन माणसांची मने जिंकली. हार्वर्ड विद्यापीठातील विभागप्रमुख त्यांच्या भाषणाने प्रभावित झाले. त्यांनी स्वामी विवेकानंदांना भारतात परत न जाण्याविषयी गळ घातली. हार्वर्ड विद्यापीठाच्या धर्मशास्त्र शाखेचे प्रमुख म्हणून काम करण्याची त्यांना विनंती केली. परंतु मातृभूमीच्या प्रेमापायी, भारतीय तरुणांचे पुनरुत्थान करण्याच्या ईर्ष्येपोटी त्यांनी हार्वर्डच्या विभागप्रमुखांना विनम्र नकार कळवला.



एक दिवस स्वामीजी आपल्या खोलीत बसले होते. त्यांना भेटायला एक व्यक्ती आली. ही व्यक्ती असामान्यातील असामान्य व्यक्ती होती. जगात त्यावेळी या व्यक्तीएवढी दुसरी श्रीमंत व्यक्ती नव्हती. प्रचंड पैसा कमावूनही या व्यक्तीची पैशासाठीची लालसा कमी होत नव्हती. सकाळ, संध्याकाळ आपल्याला पैसा कसा मिळू शकेल या विवंचनेशिवाय त्याच्या डोक्यात दुसरे काहीही नसायचे. दुर्दैवाने वयाच्या चोपन्नाव्या वर्षी या व्यक्तीला एका दुर्धर व्याधीने ग्रासले. अन्न धड खाण्याची क्षमता त्याच्यामध्ये उरली नाही. औषधोपचारासाठी प्रचंड पैसा खर्च करूनही त्याच्या तब्बेतीत फरक पडत नव्हता. अन्न खाण्याची क्षमता हरवून बसलेल्या या व्यक्तीला डॉक्टरांनी फळभाज्यांचे सूप पिण्याचा सल्ला दिला. जेमतेम एक वर्षाचे आयुष्य शिल्लक असल्याचेही डॉक्टरांनी सांगून टाकले होते.

कोणाच्या तरी सल्ल्याने ती व्यक्ती स्वामीजींना भेटायला आली. त्यावेळी स्वामीजी आपल्या खोलीत ध्यानसाधना करण्यात मग्न होते. या व्यक्तीने आपण आल्याची चाहूल लागावी अशी हालचाल केली परंतु स्वामीजींनी त्याकडे दुर्लक्ष केले. शेवटी न राहवून ती व्यक्ती स्वामीजी ध्यानस्थ बसले होते त्या ठिकाणी आली आणि स्वामीजींकडे पाहून म्हणाली “स्वामीजी, मी आलो आहे.”

स्वामीजी त्या व्यक्तीला ओळखत नव्हते. ते निर्विकारपणे म्हणाले,”मग? मी काय करू?”

स्वामीजींचे हे उत्तर ऐकून त्या व्यक्तीचा तिळपापड झाला. तो जवळ जवळ ओरडूनच म्हणाला “स्वामीजी! मी अमेरिकन अध्यक्षासमोर गेलो तर ते देखील उठून उभे राहतात आणि माझे स्वागत करतात. तुम्ही माझ्याकडे ढुंकूनही पाहायला तयार नाही?”


यावर स्वामीजी म्हणाले “तुम्ही माझ्याकडे काय काम घेऊन आलात ?“

यावर ती व्यक्ती म्हणाली “मी जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहे. माझ्यापेक्षा श्रीमंत व्यक्ती जगाच्या पाठीवर नाही. परंतु मी अत्यंत अस्वस्थ आहे, मला कसल्यातरी दुर्धर रोगाने पछाडले आहे. माझी अन्नावर वासना होत नाही. डॉक्टरांच्या मते मी फार फार तर वर्षभर जगेन.“

स्वामीजींनी त्या व्यक्तीला त्याच्या व्यवसायाविषयी, जीवनशैलीविषयी अनेक प्रश्न विचारले आणि त्याची इत्थंभूत माहिती जाणून घेतली. स्वामीजींच्या हे लक्षात आले की या व्यक्तीने पैश्याच्या हव्यासापोटी त्याचे भौतिक, अध्यात्मिक आणि शारीरिक स्वास्थ्य पार बिघडवून टाकले आहे. भौतिक त्रासाबरोबरच ही व्यक्ती शारीरिक अस्वास्थ्यालादेखील बळी पडली आहे, त्यामुळे या व्यक्तीची अन्नावरील वासना उडाली आहे आणि डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे या व्यक्तीचा मृत्यू अटळ आहे.

स्वामीजी त्या व्यक्तीकडे पाहून म्हणाले, “मी तुमच्या जीवनशैलीचा सखोल अभ्यास केला आहे. माझा तुम्हाला असा सल्ला आहे की उद्यापासून तुम्ही गरजू जनतेला दानधर्म करण्याचा संकल्प सोडा आणि तो अंमलात आणा.”

स्वामीजींच्या सल्ल्याने काही फरक पडणार नाही हे त्या व्यक्तीला माहित होते पण प्रयोग करायला हरकत नाही असा विचार करून ती व्यक्ती स्वामीजींचा निरोप घेऊन आपल्या निवासस्थानी निघून गेली.




स्वामीजींच्या सल्ल्यानुसार त्या व्यक्तीने दुसऱ्या दिवसापासून दानधर्म करायला सुरवात केली. त्यातून हळूहळू त्या व्यक्तीमध्ये समाधानाची भावना निर्माण होऊ लागली. मनावरील दडपणही कमी झाले. त्याला फरक जाणवला. त्याने हे कृत्य चालूच ठेवले आणि काय आश्चर्य, त्या व्यक्तीला आता अन्न खाण्याची प्रबळ इच्छा होऊ लागली.

पुढे या व्यक्तीने अमेरिकेत मोठमोठी इस्पितळे बांधली, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाकरता महागड्या स्कॉलरशिप सुरु केल्या. हा हा म्हणता ही व्यक्ती एक दानशूर, उदार व्यक्ती म्हणून प्रसिद्धीस आली.

जॉन रॉकफेलर नावाची प्रसिद्ध व्यक्ती ती हीच. डॉक्टरांनी एक वर्षाची जगण्याची मुदत जॉन रॉकफेलरला दिली होती पण त्याने १०० वर्षे जगण्याची प्रतिज्ञा केली आणि आपले आरोग्य सुदृढ ठेवले. वयाच्या ९६व्या वर्षी रॉकफेलरने ओहायोमध्ये अंतिम श्वास घेतला.

जॉन रॉकफेलरचा पायंडा बऱ्याच अमेरिकेन गर्भश्रीमंत व्यक्तींनी गिरवला. त्यात फुलब्राईटचे नावही पुढे आले. प्रख्यात सॉफ्टवेअरप्रणेता बिल गेट्स प्रांजळपणे कबूल करतात की त्यांचे गुरु जॉन रॉकफेलर आहेत.



छायाचित्रकार– सपना औटे



तैलचित्रकार – वरदा वैद्य



छायाचित्रकार– धनंजय वैद्य



पॉवरपॉईंट आर्ट – वरदा वैद्य

# चित्रसाहित्य

मंडळी, गेल्या वर्षी ‘चित्रसाहित्य’ हे सदर आपण सुरु केले. ऑक्टोबर २०२२ च्या अंकात शेजारची चार छायाचित्रे दिली होती. त्यातील एका वा जास्त चित्रांवरून सुचलेले विचारसाहित्य तुम्ही आम्हाला लिहून कळवायचे होते. ह्या नव्या सदराला तुम्ही प्रतिसाद दिलात, त्याबद्दल तुमचे अनेक आभार.

## चित्रसाहित्य – एप्रिल २०२३ अंकासाठीची चित्रे

खाली चार चित्रे दिली आहेत. एप्रिलच्या अंकासाठी ह्या चित्रांवरून सुचलेले साहित्य तुम्ही आम्हाला लिहून कळवायचे आहे. हे विचार शब्दांत उतरवताना साहित्यप्रकाराचे बंधन नाही. कविता, वैचारिक, ललित, माहितीपर लेख, आठवण, अनुभव, स्थलवर्णन, स्फुट विचार, दीर्घ /लघु /भय /रूपक कथा वगैरे कोणत्याही साहित्य प्रकाराचे स्वागत आहे. ह्या उपक्रमाला तुम्ही भरभरून प्रतिसाद द्याल अशी आशा करतो.



नासा–हबल दुर्बीण–१९९१



चित्रकार– वैशाली जाधव



कोजागरी – सायली अवचट



छायाचित्र– बीना सोनाळकर–बक्षी

# प्रतिबिंब

**चित्रसाहित्य**



डॉ. शारदा सबनीस

माझी ९ वर्षांची भाची आरश्यासमोर उभी राहून स्वतःकडे कौतुकाने पाहात होती. काय चालले असेल तिच्या मनात? एक–दीड वर्षाचे मूलही आरसा समोर धरला की हसते. काय समजत असेल त्या बाळाला? मोठी माणसेही काही वेगळी नाहीत. आंघोळ झाल्यावर आरश्यासमोर, मग बाहेर जाताना एक नजर आरश्याकडे पाहाणे आणि सर्व ठीकठाक असले की एक मंद स्मित करून सर्व नीट जमल्याची पावती देणे, हे तर प्रत्येक जण लपूनछपून किंवा सर्वांसमोर करतो. खरेच, असे स्वतःचे प्रतिबिंब पाहून मनात कसले विचार येत असतील? काही सुखाचे तर काही दुःखाचे, पण बहुदा स्वतःबद्दलचेच विचार.

माणूस स्वतःवर किती प्रेम करतो ना? कोणी म्हणेल मी असाच आहे – आवडलो तर उत्तमच नाहीतर द्या सोडून! दुसरी एखादी स्वतःची तुलना शेजारच्या घरातील सुमनशी करत असेल. आता कोण ज्यास्त सुंदर हे त्यांचे त्यांनीच ठरवायचे. घराबाहेर, शेजारी उभ्या असलेल्या कारच्या काचेत हळूच आपण स्वतःला पाहतो. कपड्यांच्या दुकानात तर मज्जाच! तिथे आरसेच आरसे! ‘मुगल–ए–आझम’मधील आरसेमहाल आणि त्यात नाचणारी ती मधुबाला म्हणजे डोळ्यांना मेजवानीच. ते आरसे बसवणारा तो कारागीरसुध्दा स्वतःला त्यात पहात असेल



काय? आमचा भारतीय सिनेमाही यातून वेगळा नाही. अगदी डोळ्यांत प्रेयसीचे प्रतिबिंब दाखवण्यापर्यंत ह्यांची मजल. “तेरी आँखें” ह्या विषयावर तर किती गाणी आहेत त्याचा हिशोबच नाही. ‘अमर अकबर अँथनी’ मधला अमिताभ बच्चनचा दारू पिऊन आरश्यासमोर स्वतःशीच केलेला संवाद प्रसिद्ध आहे.

खरेच, हे प्रतिबिंब माणसाला अंतर्मुख व्हायला भाग पाडते. नुसता आरसाच नाही तर शांत तलावाच्या पाण्यावर पडलेले आसमंताचे प्रतिबिंब मनातल्या कोपऱ्यांतील  आठवणींना उजाळा देते. मला तर त्या फोटोग्राफरचे कौतुक वाटते जो आरश्यासमोर बसलेल्या मॉडेलचे प्रतिबिंब आपल्या कॅमेऱ्यात सामावत असतो. प्रतिबिंबाचे प्रतिबिंब – कमाल आहे नाही?

जवळून पहिले तर ह्या फोटोत माझ्या नातवाच्या डोळ्यांत छायाचित्रकाराचे – माझ्या मुलाचे प्रतिबिंब स्पष्ट दिसत आहे. आपले गुण हे आपल्या आईवडिलांच्या गुणांचे प्रतिबिंबच नव्हेत का? आता शास्त्रात त्याला अनुवांशिकता किंवा डीएनए म्हणतात. असो. आताच नवे वर्ष सुरु झाले. गेल्या वर्षाचे प्रतिबिंब मनाच्या कोपऱ्यात सारून नवीन वर्षासाठी अशीच प्रतिबिंब तयार करण्याच्या मागे लागूया. सर्वांना नव्या वर्षाच्या आणि संक्रांतीच्या शुभेच्छा.

# प्रतिभास

चित्रसाहित्य



विदुला कोल्हटकर

लॅबमधून निघतानाच प्रिया नाराज होती. खरंतर निराश होती. दाराचं कुलूप उघडायला किल्ली काढली तर लक्षात आलं दार नुसतच लोटलेलं आहे. आत आल्या आल्या तळणीच्या वासाने तिचं स्वागत केलं. बूट काढून ती आत आली तर संदीप स्वयंपाकघराच्या दारातच उभा होता. त्याचा चेहराही तिच्यासारखाच... निराश. दोघे दोन–पाच सेकंद तसेच एकमेकांकडे बघत उभे राहिले. संदीपने विचारलं, "काय झालं?" तर प्रिया म्हणाली, "प्रयोग फसला." "माझा पण," संदीप म्हणाला.

"अरे किती दिवस मी आजच्या दिवसाची तयारी करत होते," आधी प्रिया बोलायला लागली. "सामान मागवून, सिनियर लोकांशी बोलून, सगळी मोजमापं दहादा तपासून गेले ५–६ आठवडे तयारी चालू होती. प्रयोगात आपल्याला हवे तसेच किंवा मनासारखेच रिझल्ट येतातच असं नाही, पण काहीच हाती नाही लागलं. निदान काय चुकलं ते तरी कळावं, पण ते पण नाही. छे! अगदी वैताग आलाय बघ. काहीच हाती लागलं नाही." प्रियाची सुटलेली गाडी थांबली. 'उद्या जाऊन, अभ्यास करून, पुन्हा तयारी करावी लागेल' प्रिया मनात म्हणाली.

"तुझं काय झालं? आज तर सुट्टी घेतली होतीस ना?" पडलेल्या चेहऱ्याने तिने संदीपला विचारलं.

"माझं पण तेच. प्रयोग फसला, काहीच हाती लागलं नाही" संदीप म्हणाला.
"किती दिवस तयारी करत होतो. अगदी आईने सांगितले तसे शोधून जुने तांदूळ आणून, धुऊन, भिजवून, वेळच्या वेळी पाणी बदललं, मग वाळवून बारीक करून घेतले, गूळ घालून ३–४ दिवस ते पीठ ठेवून दिलं. या थंडीच्या दिवसांत त्यावर लक्ष ठेवलं की सगळं नीट होतंय ना, पीठ ठेवलेली जागा उबदार आहे ना. आज शेवटी अनरसे तळले. अगदी मनासारखे होतील अशी अपेक्षाच नव्हती, पण काहीच हाती लागलं नाही. काही अगोड झाले, कडक झाले, काही नाहीत. तेलात घातले आणि विरघळले. छे! अगदी वैताग आलाय बघ!" पडलेल्या चेहऱ्याने संदीपने सांगितलं.

"बरं जाऊ दे. चहा केलाय चहा घे," म्हणत संदीपने कप प्रियाच्या हातात दिला. प्रिया चहाचा कप घेऊन विचारमग्न चेहऱ्याने खुर्चीवर बसली. तिच्याकडे बघून संदीपला लहानपणी खेळून घरी आल्यावर त्याच्या बाबांचा विचारमग्न असणारा चेहरा आठवला. ऑफीसमध्ये मनासारखं काम झालं नाही की ते संध्याकाळी अगदी असेच विचारमग्न दिसायचे.

इतक्यात दार वाजलं आणि शेजारचा मोहन आत आला. "अरे तुझा 'अनरसे फसले' मेसेज मगाशीच बघितला पण मीटिंगमध्ये होतो. संपली आणि लगेच आलो. दोन 'सुगरण श्री' शेजारी–शेजारी असल्याचा फायदा!" हसत हसत ओट्यापाशी जात मोहन म्हणाला. मग दोघांची आता हे अनरसे कसे वाचवायचे याची चर्चा सुरु झाली. प्रियाला दिवाळीच्या आधी आई आणि आजी अशाच ओट्यापाशी चर्चा करायच्या ते आठवलं. बहुतेक अनरसे हसले, चकल्या विरघळल्या; आता काय कराव याची अगदी अशीच गंभीर चेहऱ्याने गहन चर्चा चालू असायची.

बोलणं झाल्यावर "हे घरून काम करण्याचे फायदे!" असं म्हणत मोहन चहाचा कप घेऊन प्रियासमोर येऊन बसला. "हो ना!" म्हणत संदीपपण कप घेऊन प्रियाशेजारी बसला. संदीप आणि प्रिया दोघंही अजूनही तसेच निराश आणि विचारमग्न.

"अगं प्रिया अशी काय बसली आहेस? आणि संदीप तूपण, दोघ सेम टू सेम दिसत आहात," मोहन म्हणाला.
मनापासून तयारी आणि मेहेनत करूनही प्रयोग फसलेल्या अनेक प्रयोगकर्त्यांचं परावर्तित रूप असा प्रतिभासच त्यांच्यात होता.







**For Special Benefit of Baltimore Marathi Mandal Members**

Notary and Realtor Services Provided (with UPS Store #6852 in Wintergreen Plaza) at convenient locations: Columbia, Rockville and Burtonsville, MD.

All services are provided with proceeds donated to Baltimore Marathi Mandal. Our services include a number of functions that our members need with reference to Indian functions, such Power of Attorney documents, Apostille services, etc. Contact at above locations with E-mail and/or Phone to check the convenient time.

**Gajanan M. Sabnis**
10001 Windstream Drive
Columbia, MD 21044
TEL: 240 988 6050
E-mail: gmsabnis@gmail.com

**Mahadeo Wayal**
14713 Harvest Lane
Silver Spring, MD 20905
Tel: 240 706 1488
E-mail: mwayal@gmail.com